# शंकरराव जगताप

**माजी अध्यक्ष**, महाराष्ट्र विधानसभा




## शुभेच्छा

श्रीमती जयवंतीबेन महेता यांना सप्रेम नमस्कार.

श्री राम नाईक यांचा अमृतमहोत्सव आपण साजरा करीत आहात याबद्दल आपणांस धन्यवाद.

श्री राम नाईक व मी एकाच काळात विधानसभा सदस्य होतो. सन 1980 ते 1985 या काळात मी विधानसभेचा उपाध्यक्ष व सन 1985 ते 1990 या काळात विधानसभेचा अध्यक्ष असताना श्री राम नाईक यांच्याशी माझा अधिक जवळचा संबंध आला. विधानसभेतील कामकाजात ते जागरूकपणे व मोठ्या हिरिरीने भाग घेत असत. अभ्यासपूर्ण भाषणे आणि धारदार व भेदक आवाज ही त्यांची वैशिष्ट्ये होती. अजूनही त्याबाबतचे स्मरण ताजे वाटते. त्यावेळचे त्यांचे भाजपामधील सहकारी सदस्य श्री. राम कापसे, कै. प्रेमकुमार शर्मा, श्रीमती जयवंतीबेन मेहता यांनी आपल्या भाषणांनी सभागृह गाजविले व अनेकदा सत्ताधाऱ्यांवर अडचणीचे प्रसंग आणले, त्यामुळे सत्ताधाऱ्यांना जागरूक राहावे लागत असे. त्यांच्या भाषणांनी सभागृहाची उंची वाढण्यास चांगली मदत झाली. विधानसभेनंतर ते उत्तर मुंबई मतदारसंघातून अनेकदा खासदार झाले व मंत्रीही होते. तेथेही त्यांची कारकीर्द यशस्वी झाली. मध्यंतरी त्यांच्यावर प्रकृती बरी नसल्याने संकट आले, पण त्यांनी संकटाशी धीरोदात्तपणे सामना करीत प्रबळ इच्छा शक्तीमुळे प्रकृती उत्तम राखली आहे. एक निष्ठावंत कार्यकर्ता व लोकाभिमुख लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची प्रतिमा आजही वाखाणण्याजोगी आहे.

श्री. राम नाईक यांना अमृतमहोत्सवानिमित्त माझ्या हार्दिक शुभेच्छा.

त्यांना दीर्घायुरारोग्य लाभुन पुढील काळातही अधिक कार्यक्षम राहता यावे ही प्रार्थना.

शंकरराव जगताप

(शंकरराव जगताप)


1102, वैतरणा, सर पोचखानवला रोड, वरळी, मुंबई-400 030, दूरभाष : 022-24923459